| MHCH090001862024 | दाखल तारीख | : | २०.०२.२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंद तारीख | : | २०.०२.२०२४ |
| | निकाल तारीख | : | ०५.०६.२०२६ |
| | कालावधी | : | ०२व. ०३म. १५दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी गोंडपिपरी यांच्या न्यायालयात**
**( पिठासिन अधिकारी यु.पी. शिंदे )**

**नियमित फौजदारी खटला क्र. १९/२०२४** **निशाणी क्र.३१**

| गुन्हा नोंद क्र. ३०८/२०२३ | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | महाराष्ट्र शासन मार्फत,<br>ठाणे अंमलदार<br>गोंडपिपरी पोलीस ठाणे,<br>ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. बी. धात्रक |
| आरोपी | | १. संगिता राजाराम धुरके,<br>वयः ५५ वर्षे, धंदाः मजुरी,<br><br>२. भुषण राजाराम धुरके,<br>वयः १८ वर्षे, धंदाः मजुरी,<br><br>३. सुषमा राजाराम धुरके,<br>वयः २२ वर्षे, धंदाः मजुरी,<br>तिघेही रा. चेकदरुर, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | श्री. आर. एम. कांबळे |

**<u>भाग – ब</u>**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २१.१०.२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | २१.१०.२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २०.०२.२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ३१.०१.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | ०५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | संगिता राजाराम धुरके,<br>भुषण राजाराम धुरके,<br>सुषमा राजाराम धुरके | कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस दिली | सुचनापत्रावर सोडण्यात आले | भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ सह ३४ प्रमाणे. | आरोपींना निर्दोष मुक्त करणेत आले. | | |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | वनिता सिध्दांत दुर्गे | फिर्यादी | २८ |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | २९ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | ३० | जप्ती पंचनामा |

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०५.०६.२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये असलेला दोषारोप सिध्दतेसाठी चालविण्यात आला आहे.

## अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे

२. दि. २१.१०.२०२३ रोजी सकाळी ८.०० वाजता मौजा चेकदरुर येथे फिर्यादीने शिल्पा विजय देठे यांचे घरुन दाळ शिजवण्याकरीता कुकर आणले तेव्हा ९.३० वा.चे सुमारास आरोपी क्र.१ ही कुकर मागण्यासाठी घरी आल्याने फिर्यादीने तो कुकर तिच्या हाती देऊन परत केला. त्यानंतर आरोपी क्र.१ ची मुलगी आरोपी क्र.३ ही शिल्पा देठे यांचे घरी जाऊन तु तिला कशाला कुकर दिला असे म्हणून जोरजोराने आरडा ओरड करीत होती. सकाळी ९.४५ वा.चे सुमारास फिर्यादी आरोपी क्र.१ यांचे घरासमोरील सार्वजनिक बोरींगवर पाणी आणण्यासाठी गेली असता फिर्यादीने तिला तु कशाला आरडा ओरड करीत आहेस, एकमेकाला वस्तु देऊन मदत करावी लागते असे फिर्यादी तिला म्हणाली. तेव्हा ती फिर्यादीला तुला कुकर घेता येत नाही का असे म्हणून तिला शिवीगाळ करु लागल्याने फिर्यादी परत घरी आली. पुन्हा १०.३० वा.चे सुमारास बोरींगवर पाणी आणण्यासाठी गेली असता पुन्हा आरोपी क्र.३ ही फिर्यादीला शिवीगाळ करुन तिला हाताबुक्कयांनी मारपीठ करु लागली व आरोपी क्र.१ ही सुध्दा त्या ठिकाणी येऊन फिर्यादीचे केस पकडून दोघीही मारपीठ करु लागल्या. तेवढ्यात आरोपी क्र.२ हा बाजुला असलेल्या बैलबंडीची उभारी काढून फिर्यादीच्या उजव्या हाताच्या कोनीजवळ उभारीने मारले. त्यामुळे फिर्यादीचे उजव्या हाताचे कोनीजवळ मार लागल्याने सुजन येऊन दुखत होते. त्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनला आरोपींविरुध्द फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादी वरुन गु.र.क्र. ३०८/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये दाखल करण्यात आला. गुन्हयाचा तपास वंदीराम पाल, पो.हवा., ब.क्र.१७४२ यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी तपासादरम्यान आरोपींना अटक केली. घटनास्थळी जावुन घटनास्थळाचा पंचनामा केला. मुद्देमाल जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींविरुध्द पुरावा गोळा झाल्याने दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीवर निशाणी २० प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आला. सदरचा दोषारोप आरोपींना त्यांच्या बोलीभाषेमध्ये समजावुन सांगण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा. क्र. १ वनिता सिध्दांत दुर्गे (नि.२८) यांची साक्ष नोंदवण्यात आली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी देणारी साक्ष न दिल्याने तपास अधिकारी किंवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध पुराव्याचे स्वरुप तसेच फिर्यादी व आरोपी यांनी तडजोडीद्वारे आपसात प्रकरण मिटविल्याची बाब विचारात घेऊन तसा नि.क्र.१ खाली आदेश पारीत करण्यात आला.

६. आरोपींविरुध्द पुरावा न आल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

७. अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, युक्तीवाद तसेच आरोपींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद विचारात घेऊन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे ते येणेप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. २१.१०.२०२३ रोजी सकाळी ९.४५ ते १०.३० वाजताचे दरम्यान मौजे चेकदरुर येथे आरोपींनी संगनमत करुन त्यांच्या घरासमोरील सार्वजनिक बोरींगवर त्यातील आरोपी क्र.२ याने फिर्यादीला बैलबंडीच्या उभारीने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या कोनीजवळ मारहाण करुन तिला इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ व ३ यांनी संगनमत करुन फिर्यादीचे केस पकडून हाताबुक्क्यांनी मारहाण करुन तिला इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्याद्वारे त्यांना सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ४. | आदेश काय? | आरोपींना निर्दोष |

मुक्त करण्यात येते.

## कारणमिमांसा

८. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी ''घटनेच्या दिवशी व वेळी आरोपींनी संगनमत करुन त्यांच्या घरासमोरील सार्वजनिक बोरींगवर यातील आरोपी क्र.२ याने फिर्यादीला बैलबंडीच्या उभारीने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या कोनीजवळ मारहाण केली व आरोपी क्र. १ व ३ यांनी फिर्यादीचे केस पकडून हाताबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करुन अपमानीत केले'' हे सिध्द केले आहे किंवा कसे हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

## मुद्दा क्र.१ ते ३ साठी :

९. उपरोक्त सर्व मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत.

१०. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यापूर्वी यातील उभय पक्षांनी प्रस्तुत प्रकरण आपसात तडजोड करण्याकरिता संयुक्त परवानगी अर्ज (नि.२६) दाखल करून त्याअन्वये प्रकरण तडजोड करण्याची विनंती केली. सदरचा खटला हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० नुसार तडजोडपात्र नसल्यामुळे तडजोडीची परवानगी नाकारण्यात आली आहे. उभय पक्षांनी प्रस्तुत प्रकरण त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर समोपचाराने मिटले असल्याबाबत संयुक्त तडजोड पुरसिस (नि.२७) दाखल केली आहे.

११. अभियोग पक्षाने आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरिता फिर्यादी सा.क्र.१ वनिता यांची साक्ष नोंदविली. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, दोन वर्षापुर्वी सकाळी १० वाजताच्या सुमारास त्या बोरींगवर पाणी आणण्याकरीता गेल्या होत्या. त्यामुळे आरोपी व त्यांच्यामध्ये किरकोळ कारणावरुन किरकोळ स्वरुपाचे शाब्दीक वाद झाले होते. या व्यतिरिक्त काही झाले नव्हते. त्यानंतर त्यांनी रागाच्या भरात पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दिली होती. परंतु तक्रारमधील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षिदार या प्रकरणास सुसंगत साक्ष देत नसल्याने त्यांना भारतीय पुरावा अधिनियमाचे कलम १५४ प्रमाणे सूचक प्रश्न विचारण्यात आले. त्यामध्ये साक्षीदाराने आरोपी व त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे

मान्य केले आहे. आरोपींना गुन्हयामध्ये गोवण्याइतपत पुरावा अभियोगपक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही.

१२. फिर्यादी व आरोपी यांनी मिळुन न्यायालयात पुरसीस (नि.२७) द्वारे कळविले की, त्यांनी तडजोड केली आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हा फौजदारी प्रकिया संहिता कलम ३२० (१)(२) मध्ये आपसात मिटविण्यासारखे नसल्यामुळे फिर्यादी व आरोपी दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. दोन्ही पक्षामधील संबंध चांगले व सलोख्याचे रहावे म्हणुन दोन्ही पक्षांनी आपआपसात तडजोड केल्याचे दिसते.

१३. साक्षीदारांनी दिलेल्या मौखिक साक्षीचे अवलोकन केले असता साक्षीदार क्र.१ ने आरोपीविरुध्द फिर्याद दिली होती, असे पुराव्यामध्ये कथन केले आहे. फिर्यादीने कथन केल्याप्रमाणे व तडजोड पुरसिस (नि.२७) प्रमाणे आरोपींसोबत त्यांची तडजोड झाल्याचे देखील मान्य केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली असल्याने अभियोगपक्षाने देखील प्रस्तुत साक्षीदारां व्यतिरीक्त इतर साक्षिदारांची साक्ष नोंदविलेली नाही. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्यावरून घटनेच्या दिवशी व वेळी आरोपींनी संगनमत करुन त्यांच्या घरासमोरील सार्वजनिक बोरींगवर यातील आरोपी क्र.२ याने फिर्यादीला बैलबंडीच्या उभारीने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या कोनीजवळ मारहाण केली व आरोपी क्र. १ व ३ यांनी फिर्यादीचे केस पकडून हाताबुक्कयांनी मारहाण केली, तसेच शिवीगाळ करुन अपमानीत केले हे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या पुराव्याआधारे तसेच उभय पक्षांमधील झालेली तडजोड या बाबींचा विचार करता आरोपी विरोधात निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**<u>मुद्दा क्र.४ :-</u>**

१४. वर मुद्दा क्र. १ ते ३ मध्ये वर नमूद केलेल्या कारणास्तव आरोपी हे निर्दोष

होण्यास पात्र आहे. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता त्यामध्ये एक बैलबंडीची उभारी जप्त केलेले असल्याचे दिसून येत आहे. अंततः मी मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरात आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१ संगिता राजाराम धुरके, आरोपी क्र.२ भुषण राजाराम धुरके व आरोपी क्र.३ सुषमा राजाराम धुरके, सर्व रा. चेकदरुर, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर यांना भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे बंधपत्रे व जमानत पत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. प्रस्तुत गुन्हयात जप्त केलेली एक बैलबंडीची उभारी मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र दयावे.

(खुल्या न्यायालयामध्ये आदेशीत व उद्घघोषित.)

(Sd-)
(यु. पी. शिंदे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गोंडपिपरी.

ठिकाण :- गोंडपिपरी
दिनांक :- ०५.०६.२०२६.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : उमेश रामप्रसाद आमटे |
| न्यायालयाचे नाव | : दिवाणी व फौजदारी न्यायालय, गोंडपिपरी |
| न्यायनिर्णयाची तारीख | : ०५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : ०५.०६.२०२६ |